# 'आयसर'चे प्रा. नातू यांना जीवनगौरव

म. टा. प्रतिनिधी, पुणे



रसायनशास्त्रातील भरीव आणि सातत्यपूर्ण योगदानाबद्दल पुण्याच्या 'आयसर'मधील वरिष्ठ शास्त्रज्ञ प्रा. अरविंद नातू यांना उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या 'स्कूल ऑफ केमिकल सायन्सेस'च्या वतीने जीवनगौरव पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले.

विद्यापीठातर्फे रसायनशास्त्रावर जळगाव येथे आयोजित एका आंतरराष्ट्रीय परिषदेत माजी कुलगुरू प्रा. एस. एफ. पाटील यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रा. नातू राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेतून वरिष्ठ शास्त्रज्ञ पदावरून निवृत्त झाले असून, सध्या ते पुण्याच्या इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च (आयसर) या संस्थेत कार्यरत आहेत. पुणे विद्यापीठातून पदव्युत्तर शिक्षण आणि पीएचडी पूर्ण केल्यावर प्रा. नातू यांनी जर्मनी, पोलंड, स्वीडन आणि रशिया येथून रसायनशास्त्रात पुढील संशोधन केले. ऑरगॅनिक केमिस्ट्री, बायोऑरगॅनिक केमिस्ट्री आणि बायोलॉजी इन ड्रग डिस्कव्हरी हे त्यांच्या संशोधनाचे विषय आहेत. एनसीएलमधील कार्यकाळापासूनच प्रा. नातू विज्ञान शिक्षणात कार्यरत असून, 'आयसर'च्या स्थापनेपासून ते या संस्थेशी निगडीत आहेत. अनेक शिक्षण संस्था आणि औषध निर्मिती करणाऱ्या कंपन्यांना ते मार्गदर्शनही करतात.

महाराष्ट्र टाइम्स.
21/2/2014
Pg 5